# कोविड– १९



## कोविड– १९म्हणजे काय ?

कोविड–१९(nCov) हा एक विषाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्यावुहान शहरात सुरू झालेल्या या उद्रेकामध्ये जोकरोना विषाणू आढळला त्याला नॉवेल अर्थात नवीन करोना विषाणू असे संबोधण्यात आले आणि जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) या आजारास कोविड–१९ असे नाव दिले आहे. हा विषाणू मुख्यत्वे वटवाघळामध्ये आढळतो आणी तेथुन मानवामध्ये आल्याची शक्यता आहे.

## कोविड– १९ आजाराची लक्षणे:

हा आजार प्रामुख्याने श्वसनसंस्थेशी निगडीत आहे. यामध्ये सर्दी, खोकला, श्वासघ्यायला त्रास होणे, ताप येणे, न्युमोनियाअशी लक्षणे आढळतात. अशी लक्षणे आढळल्यास त्वरीत नजिकच्या सरकारी दवाखान्यात जाऊन कोविड–१९ ची तपासणी करुन घ्यावी.




## कोविड– १९आजार कसा पसरतो?

आजारी मानवाच्या शिंकण्या–खोकल्यातून बाहेर पडणाऱ्या थेंबातून पसरतो. संक्रमित थेंब आजूबाजूला पृष्ठभागावर पडतात आणि अशा पृष्ठभागाला स्पर्श केल्याने हे थेंब हाताच्या स्पर्शाव्दारे चेहरा, डोळे, नाक किंवा तोंडया मार्फतहाआजारपसरतो.



## कोविड–१९आजार न होण्याकरिता करावयाची उपाय योजना :

१) वारंवार साबणाने किंवा ७०% अल्कोहलयुक्त सॅनीटायझरने हात धुवावा.




२) शिंकताना, खोकलतांना नाका–तोंडावर रूमाल अथवा टिश्यू पेपर धरावा.




३)श्वसन संस्थेचे विकार असणाऱ्या व्यक्तींशी संपर्क ठेवतांना संसर्ग होऊ नये याची काळजी घ्यावी.

४) अन्न पूर्णपणे शिजवूनच खावे तसेच फळे व भाज्या न धूता खाऊ नयेत.

५) गर्दिचा ठिकाणी जाणे टाळावे.

६)सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर थुंकणे टाळावे.




६) आवश्यक असल्यास किमान ०१मीटर (०३फूट) अंतर ठेवुन कार्य करावे.




७)सर्वसामान्य नागरिकांनी हातरूमालाचा तीनपदरी मुखवटा (फेस मास्क) तयार करून वापरावा.




८) घरातील पाळी व प्राण्यांना हाताळल्यानंतर आपले हात स्वच्छ धुवावे.



९)कोविड–१९ च्या तपशील ट्रॅक करण्यासाठी भारत सरकारने सुरु केलेले “आरोग्य सेतु” मोबाईल ॲप्लिकेशन डाउनलोड करावे.




१०) रोगप्रतिकारक शक्ति वाढविण्याकरिता आयुष मंत्रालयामार्फत दिलेल्या सूचनांचे पालन करावे.




११) अत्यंत आवश्यक कार्यनसल्यास घरा बाहेर पडू नये.

१२) कोविड–१९ या आजाराला घाबरु नये पण जागरुक राहावे.

१३) कोविड–१९आजारा बद्दल अफवा पसरवु नये.

१४) वेळोवेळी शासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे.


संकलन

**डॉ. वैशाली वि. बांठीया**

समन्वयक, उन्नत भारत अभियान
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना
व
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख
पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
नगपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर

आणि

**डॉ. सारीपुत पां. लांडगे**

सहाय्यक प्राध्यापक
पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
नगपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर

मार्गदर्शक

**डॉ. ए. पी. सोमकुवर**

सहयोगी अधिष्ठाता
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय
सेमिनेरी हिल्स, नागपूर


